कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ३४ /२०२६ दि. ०६ /०२/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, कोळसेवाडी वाहतुक उपविभागाचे हद्दीत दिनांक ०७/०२/२०२६ रोजी सायंकाळी ११:०० वाजता ह.भ.प. सावळाराम महाराज किडा संकुल, मैदान डोंबिवली पुर्व येथे श्री. राजेश गोवर्धन मोरे (आमदार, कल्याण ग्रामीण) यांच्या मुलीचा विवाह सोहळा संपन्न होणार आहे. सदर विवाह सोहळयास विविध क्षेत्रातील मान्यवर (व्ही.आय.पी) तसेच नागरीक मोठया संख्येने उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) खंबाळपाडा रोड, ९० फुट रस्ता, ठाकुर्ली रोड कडुन घरडा सर्कल (छत्रपती शिवाजी महाराज चौक) कडे जाणाऱ्या सर्व प्रकारचे वाहनांना **बंदीश पॅलेस हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने बंदीश पॅलेश हॉटेल येथून डावीकडे वळण घेवून सावित्रीफुले नाटयगृह रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दिनांक ०७/०२/२०२६ रोजी दुपारी १५:०० वा. पासुन ते रात्रौ २२:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.